मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दिनांक ११ डिसेंबर २०२३ । पान १

# तळवडे येथील दुर्घटनेप्रकरणी कंपनी, मालकासह चौघांविरोधात गुन्हा दाखल

## देहूरोड पोलीस ठाण्यात करण्यात आला गुन्हा दाखल

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

तळवडे रेडझोनमधील अनधिकृत 'स्पार्कल' मेणबत्ती (कँडल) तयार करणाऱ्या कंपनीतील स्फोटात सहा महिला कामगारांचा होरपळून मृत्यू झालेल्या दुर्घटनेप्रकरणी कंपनी, जागा मालकासह चौघांविरोधात रात्री उशिरा देहूरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवराज एंटरप्रायजेस कंपनीचे मालक शुभांगी शरद सुतार (वय ३५), शरद सुतार (वय ४०, दोघे रा.पिंपरी सांडस, अशातपुरा फाटा, हवेली, पुणे) जागा मालक जन्नत नजीर शिकलगार, नजीर अमिर शिकलगार (दोघे रा.मोहननगर, चिंचवड) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी महापालिकेचे



उप अग्निशमन अधिकारी बाळासाहेब विश्वनाथ वैद्य (वय ३८) यांनी देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या दुर्घटनेत संगीता देवेंद्र आबदार (वय २८, रा.चिखली), पुनम अभय मिश्रा (वय ३६, रा.रुपीनगर, तळवडे), लता भारत दंगेकर (वय ४०, रा.रूपीनगर), मंगल बाबासाहेब खरबडे (वय ४५, रा.सहदेवनगर, तळवडे), कमलादेवी सुरज प्रजापती (वय ६१, परंडवाल चौक, देहूगाव ) आणि राधा सयाजी गोधडे (वय १८, तळवडे) या सहा महिलांचा जागीच होरपळून मृत्यू झाला आहे. तर, कंपनी मालक शरद सुतार (वय ४०) याच्यासह उषा सीताराम पाडवी (वय ४०), कविता गणेश राठोड (वय ३५), रेणुका मारूती राठोड (वय २०), कमल गणेश चौरे (वय ३५), प्रियंका अमोल यादव (वय ३२), अपेक्षा अमोल तोरणे (वय १८), शिल्पा राठोड (वय ३१), सुमन गोंधडे आणि प्रतीक्षा तोरणे (वय १६) अशा १० जणांवर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यापैकी शिल्पा, प्रतीक्षा, अपेक्षा आणि उषा या चार महिलांची प्रकृती चिंताजनक आहे.

आरोपी शुभांगी आणि शरद सुतार यांची केकवरील 'स्पार्कल' मेणबत्ती बनविण्याची कंपनी आहे. आरोपी जन्नत शिकलगार, नजीर शिकलगार यांच्या जागेत ही कंपनी आहे. आरोपी सुतार यांनी स्पार्कल' मेणबत्ती बनविण्यासाठी बेकायदेशीर व विनापरवाना स्फोटक व ज्वालागृही पदार्थांचा वापर केला. कंपनीतील कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना केल्या नाहीत. आग विझविण्यासाठी कोणतीही उपाययोजना केली नाही. त्यामुळे कामगारांच्या जीवितास धोका होऊन त्यांचा मृत्यु होऊ शकतो, याची जाणीव असतानाही शिवराज एंटरप्रायजेस कंपनी बेकायदेशीर विनापरवाना चालू ठेऊन सहा कामगारांच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# देवगड येथे सहलीसाठी गेलेले ५ विद्यार्थी बुडाले

## बुडालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ४ मुलींचा समावेश

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

कोकणातील देवगड येथे पिंपरी चिंचवड मधील फिरायला गेलेले ५ विद्यार्थी बुडाले असून यामध्ये चौघांचा मृत्यू झाला आहे. तर एकाचा शोध सुरू आहे. हि घटना आज (दि.०९) सायंकाळी घडली. निगडी येथील संकल्प सैनिकी स्कूल अकॅडमीची सहल देवगड येथे गेली होती.



ज्यामध्ये ३५ जणांचा समावेश होता. बुडालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ४ मुलींचा समावेश आहे. मृतांमध्ये अंकिता गालटे, अनिशा पडवळ, प्रेरणा डोंगरे आणि पायल बनसोडे यांचा समावेश आहे. तर राम डिचोलकर हा विद्यार्थी बेपत्ता आहे. दरम्यान, शोधकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. हे पाच जण समुद्रात अंघोळीसाठी गेले असताना ते बुडाल्याची माहिती समोर येत आहे. सर्व मृतदेह देवगड ग्रामीण रूग्णालयात हलविण्यात आले आहेत. स्थानिक पोलिसांच्या मदतीने शोधकार्य सुरू आहे.

> “ सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड येथे पर्यटनासाठी गेलेल्या संकल्प सैनिक अकादमीच्या प्रशिक्षणार्थींचा समुद्रात बुडून मृत्यू झाल्याची घटना दुर्दैवी आहे. सिंधुदुर्ग जिल्हाधिकाऱ्यांकडून या घटनेची माहिती घेण्यात आली असून अन्य प्रशिक्षणार्थींना त्यांच्या घरी सुखरूप पोहचवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मृत्यू पावलेल्या प्रशिक्षणार्थींच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. समुद्र किनारी, डोंगर दऱ्यांमध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या सर्वांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे कळकळीचे आवाहन आहे.
>
> – अजित पवार, उपमुख्यमंत्री

# ज्ञानोबा माऊलीच्या जयघोषात रथोत्सव साजरा

## माऊली माऊली च्या नामघोषात रथोत्सवाला सुरवात

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांचा रथोत्सव टाळ मृदुंगाच्या गजरात, खांद्यावर पताका घेत, डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन हरिनामाच्या गजरात, ज्ञानोबा माऊलींच्या जयघोषात असा संपन्न झाला. तत्पूर्वी रथोत्सवानिमित्ताने माऊली मंदिर येथून संत ज्ञानेश्व यांच्या पालखीने गोपाळपुरा मंदिराकडे प्रस्थान केले होते. गोपाळपुरा मंदिर येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज रथोत्सवसाठी रथात विराजमान झाले. श्रींची



तुळशी हार,पुष्पहार व वस्त्राद्वारे इ.सजावट करण्यात आली.यामुळे माऊलीं चे लोभस असे रूप दिसून येत होते.तसेच रथाची आकर्षकरीत्या फुलसजावट करण्यात आली होती. व श्री ची आरती करण्यात आली. व माऊली माऊली च्या नामघोषात रथोत्सवाला सुरवात झाली.श्री नृसिंह मठा समोर श्रींचे स्वागत व पूजन करण्यात आले.माऊलींच्या रथोत्सव मार्गावर सुंदर तऱ्हेने रांगोळी काढण्यात आली होती.पालिका चौकात पालिकेच्या आधिकारी कर्मचारी यांनी श्रींच्या रथाचे स्वागत करून त्यावर पुष्पवृष्टी केली.यावेळी माऊलींच्या रथाने गोपळपुरा ते महाद्वार चौक अशी परिक्रमा केली. त्यानंतर रथातून संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखीमध्ये विराजमान करण्यात आले. व माऊली मंदिरामध्ये त्यांनी प्रवेश केला. यावेळी पोलीस प्रशासनाचा कडक बंदोबस्त होता. यावेळी पालखी सोहळामालक, व्यवस्थापक, मानकरी, सेवेकरी, पुजारी, आळंदीकर ग्रामस्थ आणि वारकरी भाविक भक्त बहुसंख्येने उपस्थित होते.

# ‘त्या’ नऊ निष्पाप जीवांचा बळी कुणी घेतला?

## हप्तेखोरीच्या माध्यमातून हा कारखाना सुरू होता?

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पिंपरी- चिंचवडमधील तळवडे या ठिकाणी फायर कॅन्डलच्या कारखान्याला आग लागून सहा जणांचा होरपळून जागीच तर तीन जणांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. ससून रुग्णालयात सात जणांवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. या गंभीर घटनेनंतर स्फोटके आणि ज्वालाग्रही पदार्थ वापरणाऱ्या कारखान्यांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. तळवडे याठिकाणी नऊ जणांचा जीव गेल्यानंतर या निष्पाप जीवांचा बळी घेतला कोणी असा थेट प्रश्न आता उपस्थित होत आहे. तळवडे येथील ‘तो’ स्पार्कल कॅण्डल बनवणारा कारखाना हा अनधिकृत होता. यासंबंधीची माहिती पोलिसांना नव्हती का? असा देखील प्रश्न उपस्थित होत आहे. की हप्तेखोरीच्या माध्यमातून









> “अनधिकृत आणि विनापरवाना कारखान्याची माहिती पोलिसांना नव्हती. याची कल्पना असती तर कारवाई निश्चतच केली असती.
> -काकासाहेब डोळे, पोलीस उपायुक्त

> “कारखाना हा विनापरवाना चालत होता, याची माहिती महानगरपालिकेला नव्हती. आम्ही आता अशा ठिकाणचे सर्वेक्षण सुरू केलेल आहे. फायर सेफ्टी न आढळल्यास त्यांना आम्ही नोटीस देणार आहोत
> -प्रदीप जांभळे, अतिरिक्त आयुक्त महापालिका

हा कारखाना सुरू होता? असे अनेक प्रश्न विचारले जात आहेत. ‘त्या’ निष्पाप नऊ व्यक्तींचा काय दोष होता? याच पाप नेमकं कोणाला लागणार अशी चर्चा आता सुरू झाली आहे. शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास तळवडे या ठिकाणी केकवर लावण्यात येणारी स्पार्कल कॅण्डल बनवणाऱ्या कारखान्यात भीषण स्फोट होऊन ‘त्या’ आगीत जागीच सहा जणांचा होरपळून मृत्यू झाला. तर उपचारादरम्यान तीन जणांचा मृत्यू झाला आहे, हाच मृत्यूचा आकडा आता नऊ वर पोहोचला आहे. तर, सात जणांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याची माहिती ससून रुग्णालयाने दिली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. शुक्रवारी दुपारी झालेल्या या घटनेमुळे पिंपरी- चिंचवड शहरातील नागरिकांची झोप उडवली आहे. मृतांमध्ये सर्वाधिक महिलांचा समावेश आहे. मृतांच्या नातवाईकांना शासनाकडून प्रत्येकी पाच लाखांची मदत जाहीर झाली असली तरी त्या निष्पाप नऊ जणांचा बळी कुणी घेतला असा प्रश्न उपस्थित होत आहे. ‘त्या’ अनाधिकृत आणि विनापरवाना चालणाऱ्या कारखान्याची माहिती देहूरोड पोलिसांना नव्हती का? की हप्तेखोरी सुरू होती असे अनेक प्रश्न विचारले जात आहेत. तळवड्यातील ही घटना देहूरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. नऊ निष्पाप व्यक्तींचा या घटनेत दुर्दैवी मृत्यू झाला आहे. घटनेनंतर पिंपरी- चिंचवड पोलिसांचा फौज फाटा, अग्निशमन दल आणि महानगरपालिकेचे अधिकारी त्या ठिकाणी उपस्थित होते. घटनेनंतर पिंपरी- चिंचवड महानगरपालिका आणि पोलीस यांना संशयाच्या नजरेतून पाहिलं जात आहे. दोन्ही प्रशासन एकमेकाकडे बोट दाखवण्यात दंग आहेत. अशा अनाधिकृत आणि विनापरवाना चालणाऱ्या कारखान्यावर पोलीस आणि महानगरपालिका प्रशासन कारवाई करताना उदासीन दिसत आहे. तळवडेतील घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून पिंपरी- चिंचवड पोलिसांनी ठोस पावलं उचलण्याची गरज आहे. त्या निष्पाप नऊ जणांचे बळी कुणी घेतले? पोलीस की महानगरपालिका हा प्रश्न मात्र अनुत्तरीतच आहे, यावर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

# पादचारी दिनानिमित्त पीएमपीच्या जादा गाड्या

## दर तीस मिनिटांला गाडी, पीएमपीच्या संचलनात बदल




**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पादचारी दिनानिमित्त पीएमपी प्रशासनाकडून सोमवारी जादा गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. दर तीस मिनिटांच्या वारंवारितेने या गाड्या धावणार असून लक्ष्मी रस्त्यावरील गाड्यांच्या संचलनात बदल करण्यात आला आहे. पादचारी दिनानिमित्त लक्ष्मी रस्ता सोमवारी (११ डिसेंबर) वाहनविरहित ठेवण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. सोमवारी सकाळी दहा ते सायंकाळी आठ या कालावधीत लक्ष्मी रस्ता वाहतुकीसाठी आणि पार्किंगसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे नगरकर तालीम चौक ते गरूड गणपती चौकादरम्यान पादचाऱ्यांना विनाअडथळा चालता येणार आहे. यानिमित्ताने पीएमपीकडून जादा गाड्यांचे नियोजन करण्यात आले असून सकाळी दहा ते सायंकाळी सात या कालावधीत गाड्यांच्या संचलनात बदल करण्यात आला आहे. पादचाऱ्यांच्या सोयीसाठी नगरकर तालीम चौक-बाजीराव रस्ता-महापालिका भवन ते नगरकर तालीम या मार्गावर तीस मिनिटांच्या वारंवारीतेने तर स्वारगेट-उंबऱ्या गणपती चौक-स्वारगेट मार्गावर चाळीस मिनिटांच्या वारंवारीतेने गाड्या सोडण्यात येतील. डेक्कन-उंबऱ्या गणपती चौक-डेक्कन य मार्गावर दर तीस मिनिटांनी जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालय मेट्रो स्थानक येथून येणाऱ्या प्रवाशांसाठी शिवाजीनगर रेल्वे स्थानक ते स्वारगेट या मार्गावरील जिल्हा सत्र न्यायालय मार्गे तर चार मिनिटांच्या वारंवारीतेने संचलनात ठेवण्यात येणार आहेत. पुण्यदशम मार्ग क्रमांक ७ आणि ९ बंद राहणार असून मार्ग क्रमांक ५५, ५८, ५९ शनिपारकडे येताना कुमठेकर रस्ता मार्गे नियमित मार्गाने आणि शनिपारकडून जाताना अप्पा बळवंत चौक, नारायण पेठ, अलका टॉकीज चौकातून नियमित संचलनात राहणार आहेत. मार्ग क्रमांक ८१, १४४, १४४अ, १४४ क आणि २८३ मार्गावरील गाड्या पुणे स्थानकाकडे जाताना नियमित मार्गाने आणि पुणे स्थानकावरून येताना महापालिका भवन मार्गे संचलनात राहणार आहेत.

### गाड्यांच्या संचलनात बदल

**» पादचारी दिनानिमित्त लक्ष्मी रस्ता सोमवारी (११ डिसेंबर) वाहनविरहित ठेवण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. सोमवारी सकाळी दहा ते सायंकाळी आठ या कालावधीत लक्ष्मी रस्ता वाहतुकीसाठी आणि पार्किंगसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे नगरकर तालीम चौक ते गरूड गणपती चौकादरम्यान पादचाऱ्यांना विनाअडथळा चालता येणार आहे. यानिमित्ताने पीएमपीकडून जादा गाड्यांचे नियोजन करण्यात आले असून सकाळी दहा ते सायंकाळी सात या कालावधीत गाड्यांच्या संचलनात बदल करण्यात आला आहे.**

# अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनाही आता परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती!

## दरवर्षी २७ विद्यार्थ्यांची निवड



**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाची संधी देण्यासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्याची मागणी राज्य शासनाने मान्य केली आहे. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली असून, या योजनेमुळे अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचा परदेशी शिक्षणाचा मार्ग खुला झाला आहे. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी १२० कोटींचा निधी देण्याची घोषणा राज्य शासनाने दोन वर्षांपूर्वी अर्थसंकल्पात केली होती. त्यानुसार आता शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. योजनेअंतर्गत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी क्यूएस जागतिक क्रमवारीमध्ये पहिल्या २०० संस्थांमध्ये स्थान मिळवलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणे बंधनकारक आहे. पदव्युत्तर पदवी, पी.एचडी. अभ्यासक्रमासाठी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. दरवर्षी २७ विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकणार आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी या अभ्यासक्रमांसाठी एकूण १०, औषध आणि जीवशास्त्र, लिबरल आर्ट, मानव्यता या शाखांसाठी प्रत्येकी सहा, कृषिसाठी तीन आणि कायदा, वाणिज्यसाठी दोन अशा एकूण २७ शिष्यवृत्ती देण्यात येणार आहेत. मुस्लिम समाजातील १५, बौद्ध ७, ख्रिश्चन १, जैन १, पारशी १, ज्यू १, शीख १ अशा एकूण २७ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. अल्पसंख्याक समुदायातील एकूण लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रमाणात ही शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

# पादचारी दिन म्हणजे शोकदिन

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पाद चाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सुविधेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याऐवजी वर्षातून एकदा पादचारी दिन आयोजित करून महापालिका केवळ वार्षिक आनंदोत्सव साजरा करत आहे. मात्र प्रत्यक्षात पादचाऱ्यांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याने पादचारी दिन हा पादचाऱ्यांसाठी शोकदिन असल्याची टीका 'पादचारी प्रथम' संस्थेने केली आहे. पादचारी दिनानिमित्त लक्ष्मी रस्ता सोमवारी वाहनविरहित ठेवण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. सोमवारी सकाळी दहा ते सायंकाळी आठ या कालावधीत लक्ष्मी रस्ता वाहतुकीसाठी आणि पार्किंगसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर पादचारी प्रथम या संस्थेचे अध्यक्ष प्रशांत इनामदार यांनी महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांना निवेदन दिले आहे. महापालिकेने पादचारी धोरण आणि शहरी मार्ग मार्गदर्शक धोरण यापूर्वीच स्वीकारले आहे. त्यामुळे पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी काय करणे अपेक्षित आहे, याची जाणीव महापालिकेला आहे. मार्गदर्शक तत्वांनुसार आणि रस्त्यांच्या योग्य रचनेसह या धोरणाची अंमलबजावणी केली असती तर आज परिस्थिती वेगळी दिसली असती. पादचाऱ्यांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याची वस्तुस्थिती आहे. महापालिका केवळ रस्ते करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. रस्ता रुंदीकरणासाठी झाडे तोडली जात असून पदपथ अरूंद केले जात आहेत. पादचारी सिग्नलचा वेळ कमी करण्यात आला आहे. पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेची तडजोड करण्याचे धोरण महापालिकेने स्वीकारल्याचे दिसत आहे.

# इंद्रायणी तांदळाच्या उत्पादनात घट!

## बाजारात एक किलो इंद्रायणी तांदळाचे भाव ६० रुपयांपर्यंत

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पावसाने ओढ दिल्याने मावळातील सुवासिक इंद्रायणी तांदळाच्या लागवडीत यंदा घट झाली आहे. उत्पादन कमी झाल्याने गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा इंद्रायणी तांदळाच्या भावात वाढ झाली आहे. किरकोळ बाजारात एक किलो इंद्रायणी तांदळाचे भाव ६० रुपयांपर्यंत आहेत. सुवासिक इंद्रायणी तांदळाला गेल्या काही वर्षांपासून मागणी वाढली आहे.



पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, भोर, वेल्हा भागात इंद्रायणी तांदळाची लागवड केली जाते. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बियाणांची लागवड केली जाते. यंदा पाऊस कमी झाल्याने इंद्रायणी तांदळाच्या लागवडीत घट झाली आहे, असे मावळ तालुक्यातील शेतकरी ज्ञानेश्वर ठाकर आणि भीमराव मोहोळ यांनी सांगितले. २० ते २५ वर्षांपूर्वी इंद्रायणीचे वाण विकसित करण्यात आले होते. या वाणाची मुदत साधारणपणे वीस वर्षांची होती. मात्र, त्यात बदल करून इंद्रायणीचे वाण विकसित करण्यात आले, असे त्यांनी नमूद केले. वेल्हे तालुक्यातील राजगड, तोरणा, गुंजन मावळ भागातील शेतकऱ्यांनी इंद्रायणी तांदळाला ६५ ते ७० रुपये प्रतिकिलो भाव देण्याची मागणी केली आहे. नसरापूर आठवडे बाजारात काही शेतकरी कमी भावाने इंद्रायणी तांदळाची विक्री करतात. दरवर्षी शेतकऱ्यांकडून तांदूळ खरेदी करणारे व्यापारी भाव वाढवून देत नाहीत. लागवड खर्च, दैनंदिनी खर्चासाठी शेतकऱ्यांनी पैशांची गरज असल्याने शेतकरी कमी भावाने तांदळाची विक्री करतात, असे वेल्हे तालुक्यातील शेतकऱ्यांनी सांगितले.

> **“ यंदा पावसाने ओढ दिल्याने लागवड कमी झाली. इंद्रायणी भातावर प्रक्रिया करुन त्याची विक्री केली जाते. काही मिलचालक थेट भात खरेदी करतात. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने गेल्या वर्षापासून शेतकऱ्याकडून भात (साळ) खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. साळीला प्रतिकिलोचा भाव २७ ते २८ रुपयांपर्यंत आहे.**
>
> **– संताजी जाधव,**
> **कृषी अधिकारी, पंचायत समिती,**
> **वडगाव मावळ**

# पुण्यातील एका कार्यकर्त्याचा असाही विक्रम

## तब्बल १७५ वे रक्तदान करून ससून रक्तपेढीमध्ये विक्रम नोंदवला

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने आवाज उठवण्यासाठी सारंग यादवाडकर यांची ओळख आहे. मात्र त्यांची आता आणखी एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. नियमित रक्तदान करणाऱ्या यादवाडकर यांनी नुकतेच तब्बल १७५ वे रक्तदान करून ससून रक्तपेढीमध्ये विक्रम नोंदवला. यादवाडकर हे पेशाने वास्तुविशारद आहेत. पुण्यातील पर्यावरणाशी संबंधित प्रश्नांवर ते सातत्याने आवाज उठवत असतात. त्यामुळे पर्यावरणप्रेमी कार्यकर्ते म्हणून त्यांची पुण्यात ओळख आहे. मात्र त्याशिवाय ससून रुग्णालय रक्तपेढी येथे गेल्या ४५ वर्षांपासून नियमितपणे दर तीन महिन्यांनी रक्तदान करतात. वयाची ६५ वर्षे पूर्ण होत असल्याने त्यांनी केलेले रक्तदान १७५वे ठरले. यादवाडकर यांच्या रक्तदानाच्या या विक्रमाची दखल घेण्यासाठी ससून रुग्णालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. श्रीनिवास शिंत्रे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. या प्रसंगी ससून रक्तपेढीच्या प्रमुख डॉ. लीना नकाते, डॉ. सोमनाथ खेडकर, समाजसेवा अधीक्षक विभागाचे प्रमुख डॉ. शंकर मुगावे आदी उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने आवाज उठवण्यासाठी सारंग यादवाडकर यांची ओळख आहे. मात्र त्यांची आता आणखी एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. नियमित रक्तदान करणाऱ्या यादवाडकर यांनी नुकतेच तब्बल १७५ वे रक्तदान करून ससून रक्तपेढीमध्ये विक्रम नोंदवला. यादवाडकर हे पेशाने वास्तुविशारद आहेत. नियमित रक्तदानाविषयी यादवाडकर म्हणाले, की नुकतेच मी १७५वे रक्तदान केले. मागे वळून पाहताना मला खूप समाधान वाटते. मात्र पुढे पाहताना मला दुःख वाटते. कारण वयाची ६५ वर्षे झाल्याने आता मला रक्तदान करता येणार नाही. माझी सर्व नागरिकांना विनंती आहे, की जास्तीत जास्त वेळा रक्तदान करा. रक्तदान केल्यामुळे काहीही नुकसान होत नाही, धोका होत नाही, उलट फायदाच होतो, समाजाला प्रचंड फायदा होतो. आपल्या रक्तदानामुळे गरज असलेल्यांना रक्त मिळते. तसेच आपल्याला अतिशय मोठे समाधान मिळते.




### यादवाडकर यांचा विशेष सन्मान

**» यादवाडकर हे पेशाने वास्तुविशारद आहेत. पुण्यातील पर्यावरणाशी संबंधित प्रश्नांवर ते सातत्याने आवाज उठवत असतात. त्यामुळे पर्यावरणप्रेमी कार्यकर्ते म्हणून त्यांची पुण्यात ओळख आहे. मात्र त्याशिवाय ससून रुग्णालय रक्तपेढी येथे गेल्या ४५ वर्षांपासून नियमितपणे दर तीन महिन्यांनी रक्तदान करतात. वयाची ६५ वर्षे पूर्ण होत असल्याने त्यांनी केलेले रक्तदान १७५वे ठरले. यादवाडकर यांच्या रक्तदानाच्या या विक्रमाची दखल घेण्यासाठी ससून रुग्णालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. श्रीनिवास शिंत्रे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.**